संचिका दाखल तारीख १०/१०/२०२२
संचिका नोंदणी तारीख १०/१०/२०२२
संचिका निकाल तारीख १३/०८/२०२५
कालावधी ०२ वर्ष १० महिने ०३ दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांच्या न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी– श्री. डी. बी. गुट्टे)**

**म.कौ.हिं.सं. अर्ज क्र. १८/२०२२** **नि.क्र –३३**
**CNR-MHCH080010462022**

१. सौ. शितल सुरेश ढोरे,
वय – २५ वर्ष, धंदा – घरकाम,
२. आराधना सुरेश ढोरे,
वय — ७ वर्ष, धंदा – काही नाही,
३. सायरा सुरेश ढोरे,
वय — २ वर्ष, धंदा – काही नाही,
अ.पालनकर्ती आई अर्जदार क्र.१
सर्व रा. चिंचोली, ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर.

**.....अर्जदार**

**विरुध्द**

१. सुरेश प्रकाश ढोरे,
वय – ३० वर्ष, धंदा – नोकरी,
रा. सुर्या कंपनी क्वाटर (चूना भट्टी), हिवरधरा,
ता. वणी, जि. यवतमाळ. **.....गैरअर्जदार**

दोषारोप — कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ खाली कलम १८, १९, २० व २२ प्रमाणे.

==================================

अर्जदारांतर्फे – सी. पी. गोहणे मॅडम, विधीज्ञ.
गैरअर्जदारातर्फे – श्री. व्ही. एम. रामटेके, विधीज्ञ.

==================================

## –न्या य नि र्ण य–

(घोषित दिनांक १३/०८/२०२५)

**अर्जदार हिचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे–**

२. अर्जदाराचा प्रेमविवाह गैरअर्जदारासोबत दि.१४.०४.२०१५, रोजी मौजा टेंभरी पो.मोहरणा ता. लाखांदूर येथे झाला. लग्नानंतर ते हिंगणा जिल्हा नागपूर येथे किरायाने राहू लागले. तिथे गैरअर्जदाराने तिला काही दिवस चांगली वागणूक दिली. त्यानंतर ते हिंगणा येथे दोन–तीन महिने राहून तिच्या माहेरी टेंभरी ता. लाखांदूर येथे परत राहण्याकरीता आले. तेंव्हा तिच्या वडीलांनी त्यांना राहण्याकरीता एक रुम किरायाने दिली. तिथे राहत असतांना, गैरअर्जदार हा दारू पिऊन येऊन तिला मारहाण करायचा. त्याने मारहाण केल्यामुळे तिच्या हातातील बांगडया फुटल्या व जखम होऊन रक्तस्त्राव झाला. दि.३१.०८.२०१५ रोजी मुलगी आराधना हिचा जन्म झाला. तरी सुध्दा गैरअर्जदार हा दारू पिऊन येऊन तिला मारहाण करीत होता व उदरनिर्वाहाकरीता कोणतीही आर्थिक मदत करीत नव्हता. गैरअर्जदार हा तिला नेहमी ''ढिवरीन'' असे अपमानास्पद बोलायचा. दि.१५.०७.२०२० रोजी अर्जदार क्र.३ सायरा हिचा जन्म झाला. त्यानंतर ते कामानिमीत्ताने मौजा हिवरधरा ता. वणी जि. यवतमाळ येथे वास्तव्याने गेले. तिथे गैरअर्जदार हा सुर्या कंपनी (चुना भट्टी) येथे काम करीत होता व ते कंपनीच्या क्वाटरमध्ये राहत होते. कंपनीमध्ये कामावर असतांना गैरअर्जदार हा दारू पिऊन येत होता व तिला मारहाण करीत होता. तिला घर खर्चाकरीता एकही पैसा देत नव्हता व ''तुझ्या बापाने एकही पैसा दिला नाही, माहेरून रु.१०,०००/– आण'' असे म्हणून मारहाण करीत होता. गैरअर्जदाराने व्यसनामध्ये सर्व पैसे खर्च केले.

३. अर्जदार क्र.२ ही शाळेत शिक्षण घेत होती, परंतु शाळा ही त्यांच्या घरापासून ३ किलोमिटर अंतरावर असल्यामुळे तिने गैरअर्जदाराला माहेरी राहण्याबद्दल विचारले असता, त्याने तिला मुलींसह चिंचोली येथे आणून रूम करून ठेवले. त्यानंतर तो त्यांना भेटायला आला नाही. त्याने त्यांना आर्थिक मदत केली नाही. त्यानंतर तिने पोलीस स्टेशनला त्याच्याविरूध्द तक्रार दाखल केली. त्यावेळी त्याने तिला फोनवर फाशी लावून

मरतो व तुला फसवतो म्हणून धमकी दिली. तिच्याकडे कुठलेही उत्पान्नाचे साधन नाही. उलट गैरअर्जदार हा सुर्या कंपनीत काम करतो. त्याला दरमहा रु.२२,०००/- पगार मिळतो. त्याच्याकडे शेती व चारचाकी गाडी आहे. म्हणून तो त्यांना सहज पोटगी देऊ शकतो. म्हणून तिने प्रस्तुतचा अर्ज संरक्षण आदेश, पोटगी दरमहा रु.१५,०००/-, घरभाडे रु.२,००,०००/- व नुकसान भरपाई रु.३,००,०००/- मिळावेत म्हणून दाखल केला आहे.

४. गैरअर्जदार या प्रकरणामध्ये न्यायालयासमक्ष हजर झाला. परंतू त्याने त्याचे लेखी उत्तर दाखल केले नाही. त्यामुळे अर्ज त्याच्या म्हणणविना पुढे चालविण्यात आला.

५. अर्जदाराच्या कथनावरुन माझ्या मते खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत आहेत. सदरील प्रत्येक मुद्दयांचा निष्कर्ष मी कारणांसहीत अनुमान काढून खालीलप्रमाणे नोंदवलेला आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र.१ ने सिध्द केले आहे काय की, ती व्यथीत व्यक्ती आहे व गैरअर्जदाराने तिचा कौटुंबिक हिंसाचार केला ? | होय. |
| २ | अर्जदारांनी सिध्द केले आहे काय की, ते गैरअर्जदाराकडून पोटगी मिळणेस पात्र आहे ? असल्यास किती ? | अर्जदार क्र.१ ला दरमहा रु.२०००/- व अर्जदार क्र.२ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रु.१५००/-. |
| ३ | अर्जदार क्र.१ ने सिध्द केले आहे काय की, ती गैरअर्जदाराकडून दरमहा घरभाडे मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | दरमहा रु.१०००/-. |
| ४ | अर्जदार क्र.१ ने सिध्द केले आहे काय की, ती गैरअर्जदाराकडून नुकसान भरपाई व अर्जाचा खर्च मिळण्यास पात्र आहे काय? | अंशतः होय. |
| ५ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>–कारणमिमांसा–</u>**

६. अर्जात केलेल्या मागण्या सिध्द करण्यासाठी अर्जदार हिने तिचे शपथपत्र निशाणी क्र. ११ नुसार दाखल केले. त्यानंतर अर्जदारातर्फे पुरावा बंद पुरसीस निशाणी २८ नुसार देण्यात आली. अर्जदार हिने तिची भिस्त विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र निशाणी २०, तिचे व अर्जदार क्र.२ व ३ चे आधार कार्ड निशाणी २१, २२ व ३२, एन. सी. अहवाल निशाणी २४, पोलीस स्टेशनला दिलेली तक्रार निशाणी २६ व पोलीसांनी तिचे नोंदविलेले बयाण निशाणी २७ या कागदोपत्री पुराव्यावर ठेवली आहे. गैरअर्जदाराने पुरावा दिला नाही. त्यामुळे त्याच्यातर्फे कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही.

७. अर्जदारांतर्फे विधीज्ञ सी. पी. गोहणे मॅडम यांचा युक्तिवाद ऐकला. गैरअर्जदार व त्यांच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता, गैरहजर. करीता गैरअर्जदारातर्फे युक्तिवाद नाही.

**<u>मुद्दा क्र १ बाबत.</u>**

८. कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार कुठलीही मदत मिळण्याकरीता अर्जदार ही गैरअर्जदारासोबत रहात होती, तिचे गैरअर्जदारासोबत कौटुंबिक संबंध होते व गैरअर्जदाराने तिचा कौटुंबिक हिंसाचार केला ही बाब अर्जदारास प्रथमतः सिध्द करणे गरजेचे आहे. अर्जदाराचे पुराव्याचे शपथपत्र म्हणजे तिच्या अर्जाची पुनरावृत्ती दिसून येते. तिने तिच्या तोंडी पुराव्यात तिचा विवाह गैरअर्जदारासोबत दि.१४.०४.२०१५, रोजी मौजा टेंभरी पो.मोहरणा ता. लाखांदूर येथे झाला. त्यानंतर ती गैरअर्जदाराकडे नांदायला गेली असे कथन केले आहे. तिने तोंडी पुराव्यासोबतच अभिलेखावर विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. त्यावरून असे दिसून येते की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दि.१४.०४.२०१५ रोजी टेंभरी येथे झाला व ती लग्नानंतर गैरअर्जदाराकडे नांदायला गेली होती. म्हणून वरील पुराव्यावरुन अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी आहे व ती गैरअर्जदारासोबत एका कुटुंबात रहात होती ही बाब सिध्द होते. तसेच आधार कार्ड निशाणी २२ व ३२ वरून सिध्द होते की, अर्जदार क्र. २ व ३ या त्यांच्या मुली आहेत.

९. दुसरी महत्वाची बाब म्हणजे गैरअर्जदाराने तिचा कौटुंबिक हिंसाचार केला हे तपासून पहाणे गरजेचे आहे. अर्जदाराने तिच्या तोंडी पुराव्यात असे कथन केले आहे की, लग्नानंतर गैरअर्जदाराने तिला काही दिवस चांगले नांदविले. त्यानंतर तो दारू पिऊन येऊन

तिला मारहाण करायचा. टेंभरी या गावी राहत असतांना, त्याने तिला मारहाण केली, त्यामुळे तिच्या बांगडया फुटल्या व हाताला जखम होऊन रक्तस्त्राव झाला. अर्जदार क्र.२ व ३ चा जन्म झाल्यानंतर देखील त्याच्या वागण्यामध्ये फरक पडला नाही. मुलींचा जन्म झाल्यानंतर देखील त्याने तिला अनेकवेळा मारहाण केली. उदरनिर्वाहाकरीता कोणतीही आर्थिक मदत केली नाही. तो तिला ''ढिवरीन'' असे अपमानास्पद बोलायचा. कामानिमीत्त हिवरधरा ता. वणी जि. यवतमाळ येथे गेले असता, तेथे देखील त्याने तिला दारु पिऊन मारहाण केली. तो तिला घर खर्चाकरिता एकही पैसा देत नव्हता व ''तुझ्या बापाने एकही पैसा दिला नाही, माहेरून रु.१०,०००/– आण'' असे म्हणून मारहाण करीत होता. त्याने व्यसनामध्ये सर्व पैसे खर्च केले. अर्जदार क्र.२ च्या शिक्षणासाठी त्याने तिला मुलींसह चिंचोली येथे रूम करून ठेवले. त्यानंतर तो तिला भेटण्यासाठी आला नाही व कुठलीही आर्थिक मदत केली नाही. म्हणून तिने पोलीस स्टेशनला त्याच्याविरूध्द तक्रार दाखल केली. त्यावेळी त्याने तिला फोनवर फाशी लावून मरतो व तुला फसवतो म्हणून धमकी दिली.

१०. सदर कथनाच्या पृष्ठर्थ अर्जदाराने पोलीसाकडे दिलेली एन.सी. रिपोर्ट निशाणी २४, पोलीसांना दिलेले बयाण निशाणी २६ असे दस्त दाखल केले आहेत. त्यावरून असे दिसून येते की, गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ चा कौटुंबिक हिंसाचार केला. दारू पिऊन पत्नीला मारहाण करणे व आर्थिक मदत न करणे या सर्व बाबी कौटुंबिक हिंसाचारात मोडतात. अर्जदाराच्या वरिल तोंडी पुराव्याचे गैरअर्जदारातर्फ कुठेही खंडण झालेले नाही. म्हणून उपलब्ध पुराव्यावरुन मी या मतास आलो आहे की, गैरअर्जदाराने तिचा कौटुंबिक हिंसाचार केला. अर्जदाराचा गैरअर्जदाराने कौटुंबिक हिंसाचार केला ही बाब पुराव्यानिशी सिध्द झालेली आहे. अर्जदार व गैरअर्जदाराचे नाते संबंध आजही अस्तित्वात आहेत. त्यामुळे तिला संरक्षण आदेश देणे गरजेचे आहे व ती सरंक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ ते ४ बाबत.</u>**

११. अर्जदाराने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, तिच्याकडे कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही. उलटपक्षी गैरअर्जदाराला नोकरी असून त्याला दरमहा रु.२२,०००/– पगार मिळातो. त्याच्याकडे शेती व चारचाकी वाहन आहे. त्यामुळे गैरअर्जदाराने तिला व तिच्या मुलींना अन्न, वस्त्र यासाठी दरमहा रु.१५,०००/–, घरभाडे रु.२,००,०००/– व नुकसान भरपाई म्हणून रु.३,००,०००/– द्यावेत असे कथन केले

आहे. कायद्याने गैरअर्जदार हा दरमहा किती पैशे कमावतो ही बाब सिध्द करण्याची जबाबदारी गैरअर्जदारावरच असते.

१२. गैरअर्जदार हा खटल्यामध्ये हजर राहिला नाही. त्याने त्याचा पुरावा दिला नाही. म्हणून गैरअर्जदाराच्या उत्पन्नाविषयी निष्कर्ष काढणे येथे गरजेचे आहे. अर्जदार हिने गैरअर्जदार कंपनीत नोकरी करतो व त्याच्याकडे शेती आहे, याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. जरी गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कागदोपत्री पुरावा नसेल तरी आजमितीस दैनंदिन जिवनामध्ये एखादा व्यक्ती सदृढ असेल व तो नोकरी करत असेल तर तो किमान दरमहा रु.१५,०००/– नक्कीच कमावतो. त्यामुळे गैरअर्जदार अर्जदारांना पोटगी देण्यास सक्षम आहे. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदाराची कायदेशीर लग्नाची पत्नी आहे व अर्जदार क्र. २ व ३ या त्यांच्या मुली आहेत. पती व वडील म्हणून त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. वरिल चर्चेमध्ये मी गैरअर्जदार हा दरमहा रु.१५,०००/– रुपये कमावतो या मतास आलो आहे. सध्याची महागाई व अर्जदारांचे राहणीमान व गैरअर्जदाराचे उत्पन्न लक्षात घेता, अर्जदार क्र.१ ला दरमहा रु.२०००/– पोटगी, अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रु.१५००/–, घरभाडे म्हणून दरमहा रु.१०००/–, नुकासान भरपाई म्हणून रु.५,०००/– व अर्जाचा खर्च रु.१०००/– देणे न्यायोचित होईल. म्हणून मी वरिल पुराव्याच्या अनुषंगाने मुद्या क्र. २ ते ४ चे उत्तर वरीलप्रमाणे नोंदवून मुददा क्र.५ चे उत्तरात खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**–आदेश–**

०१– अर्ज अंशतः खर्चासह मंजूर करण्यात येतो.

०२– गैरअर्जदाराने अर्जदाराचा कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार किंवा तशी कोणतीही कृती करु नये किंवा त्यासाठी सहाय्य किंवा प्रवृत्त करु नये असा सरंक्षण आदेश देण्यात येतो.

०३– गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ हिला पोटगी म्हणून दरमहा रु.२०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रु.१५००/– हा अर्ज दाखल झालेल्या तारखेपासून द्यावेत.

०४– गैरअर्जदाराने अर्जदार हिला घर भाडयापोटी दरमहा रु.१०००/– हा अर्ज दाखल तारखेपासून द्यावेत.

०५– गैरअर्जदाराने अर्जदाराला नुकसान भरपाई म्हणून रु.५,०००/– व अर्जाच्या खर्चापोटी रु.१०००/– या आदेशापासून एक महिन्याच्या आत द्यावेत.

०६– या न्यायनिर्णयाची प्रत अर्जदाराला व गैरअर्जदाराला विनामुल्य देण्यात यावी तसेच संरक्षण अधिकारी व पोलीस ठाणे, ब्रम्हपुरी यांना पुढील कारवाईसाठी प्रत्येकी एक प्रत पाठवण्यात यावी.

***न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला.***

DNYANESHWAR BHAGWAT GUTTE

Digitally signed by DNYANESHWAR BHAGWAT GUTTE
Date: 2025.08.14 10:31:39 +0530

दिनांक १३/०८/२०२५.

**( डी. बी. गुट्टे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
ब्रम्हपुरी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are word to word, as per original Judgment.

Name of Stenographer : N.B. Chavhan.